

(डॉ. सुनंदा व सुभाष रानडे फाऊंडेशन तर्फे पारितोषिक प्राप्त लेख)

# पुरुष वंध्यत्व - एक रुग्णानुभव



वैद्य महेश ठाकूर

**यस्तु रोगमविज्ञाय कर्माण्यारभते भिषक्।**
**अप्यौषधविधानज्ञस्तस्य सिद्धिर्यदृच्छया।।**

च.सू.२०/२१

जो वैद्य रोग नीट जाणून न घेता चिकित्सा सुरु करतो, तो औषधांचा उत्तम ज्ञाता असला तरी त्याला चिकित्सेत यश यदृच्छेने मिळते. अर्थात औषधांचे चांगले ज्ञान आहे पण व्याधीच नीट समजला नसेल तर उत्तमोत्तम औषधे वापरुनही चिकित्सेत यश मिळेलच याची खात्री नसते. म्हणूनच चिकित्सेत यश निश्चिती हवी असेल तर वैद्याने रोगाचा साकल्याने अभ्यास करुनच चिकित्सा सुरु करावी. रुग्णाचा व व्याधीचा सखोल इतिहास, अनेकविध हेतू, त्यांचा दोष-धातु-मल-स्रोतसे आदिंवरील परिणाम, दोषांची गति, स्थानांतरण-स्थानसंश्रय, दोष-दूष्यांची संमूर्च्छना अशा अनेक पैलूंचे बारकाईने आकलन व विश्लेषण करुन मगच चिकित्सेचा protocol ठरवावा आणि त्यानुसार कर्मांची व औषधांची योजना केल्यास यश सहजसुलभ मिळते. चरकाचार्यांच्या वरील सूत्राचा यथार्थ प्रत्यय देणारा हा एक रुग्णानुभव.

सुमारे दहा वर्षांपूर्वी ३५ वर्षे वयाचा तरुण अनापत्यततेची तक्रार घेऊन आला. विवाहानंतर २ वर्षे संतानप्राप्ती न झाल्याने इन्फर्टिलिटी स्पेशालिस्टकडे आधुनिक वैद्यकिय चिकित्सा सुरु केली. विविध तपासण्यांती Azoospermia (0 शुक्राणु) असे निदान व त्या अनुषंगाने चिकित्सा सुरु झाली. मात्र दोन अडीच वर्षे चिकित्सा घेऊनही शुक्राणूंच्या संख्येत विशेष वाढ न झाल्याने पर्याय म्हणून आयुर्वेदीय चिकित्सा करुन पहावी या हेतूने माझ्याकडे आला. या प्राथमिक माहितीनंतर आयुर्वेदीय दर्शन, स्पर्शन, प्रश्नादि परिक्षणातून पुढील गोष्टी समोर आल्या.

दि.१७/७/१०

**वर्तमान व्याधी लक्षण-अनापत्यता (४वर्षांपासून)**

*अम्लपित्त-२ १/२ -३ वर्षे व (त्यासाठी विविध प्रकारच्या Antacids चा वापर) *छर्दि - ८-१० दिवसातून एकदा *हृद्दाह- वारंवार *अंगमर्द-प्रात: (प्राय:दररोज) *सर्वांगावर वरटीदंशसंस्थानवत् मंडले व शोथ १ - ११/२ वर्षे. तसेच त्यासाठी एकदिवसाआड Antihistamine गोळीचे सेवन *आहार-कटु, अम्ल, लवण रसप्रधान, उष्ण, तीक्ष्ण (उदा. ठेचा, मिसळ, तळलेल्या मिरच्या, तिखट रस्सायुक्त मांसाहार, इ.चमचमीत व मसालेदार) आठवड्यातून २-३ वेळा मद्यपान, दिवसातून ४ते५ वेळा तंबाखूसेवन *प्रकृति-वातपित्तज *नाडी-पित्तकफ *मल-साम/दुर्गंधीयुक्त *मूत्र-अविशेष *जिह्वा-अल्पसाम *शब्द-अविशेष *स्पर्श-अविशेष *दृक्-आविल *आकृति- मध्यम शरीरयष्टी

**दुष्ट स्रोतस परीक्षण-** *सुरतशक्ति समर्थ *संभोग काल-रात्रौ २-३/आठवडा *ध्वजोत्थानादि विकृति नाही. *जननेंद्रिय अविकृत *हर्ष प्राकृत *सार्वदेहिक शुक्रप्रभावज अवयव - अविकृत

**शुक्र परीक्षण-** प्रयोगशालेय (Semen Analysis Test Reports as available):
1)24/3/2009→No Sperm seen 2)11/4/2009→Pus cell++gram+ve cocci(Treated with heavy antibiotics) Testosterone estimation-Normal 3)7/6/2009→Pus Cell+;gram + ve cocci 4)8/7/2009→0.13 million;69% non-motile 5)5/9/2009→0.2 million; 60% non-motile 6)9/3/2010→0.27 million; 75% non-motile

वरील Reports नुसार शुक्रक्षीणता आणि पूतिपूययुक्त शुक्र यासारखी शुक्रदुष्टीची लक्षणे आढळली.

**संप्राप्ती विचार:** रुग्णाची एकंदर जीवनशैली व रोगेतिहास पाहता कटु, अम्ल आणि लवण रसाचा अतियोग, उष्ण, तीक्ष्ण पदार्थांचे सेवन, मद्य आणि तंबाखूचे सातत्य यामुळे प्रथम अग्निदुष्टी तसेच पित्त व कफ दोषांची क्रमश: चय, प्रकोप व प्रसर या क्रमाने वृद्धी होऊन पुढे विविध स्रोतसांमध्ये/स्थानांमध्ये संश्रय व संबंधित धातूंमध्ये दुष्टी असा संप्राप्तीचा आलेख दिसून आला.

काश्यप संहितेत अम्लपित्त संप्राप्तीचे विस्तृत वर्णन आहे. हा व्याधी आमाशयोत्थ असून कफपित्त त्याच्या आश्रयाने असतात.

**व्याधिरामाशयोत्थोऽयं कफपित्ते तदाश्रये।।**

काश्यप खिलस्थान १६/१८

**शुक्रल, शुक्रकर, शुक्रवर्धन, शुक्रद, शुक्रप्रद ह्या पदातून शुक्रनिर्मितीच्या विविध छटा व अवस्था समजून घेतल्या पाहिजेत.**

मिथ्या आहारविहाराने मंद झालेला अग्नि अन्नाचे योग्य पचन करण्यास असमर्थ होतो. यामुळे आमाशयस्थित अपाचित अन्नाला अम्लता, शुक्तत्व आणि विदग्धता येते. वारंवार हेतुसेवनाने ही अम्लता वाढून नंतर खाल्लेल्या पथ्यकर अन्नाचाहि विदाह होत राहतो. या दुष्टचक्रातून पुढे आहाररसालाही अम्लता प्राप्त होते (**रसधातौ तथा अम्ले**- काश्यप). अन्य धातुंचे पोषण करणारा हा आहाररस अम्लसंपृक्त होऊन सर्व शरीरात पसरतो व विविध धातू, मल, स्रोतस आणि स्थान/अवयव यांना दूषित करुन त्यांच्या प्राकृत रचना व कार्यामध्ये बाधा आणतो.

प्रस्तुत रुग्णामध्ये पित्तकफ वृद्धीने अनेक वर्ष आमाशय दुष्टी व त्यामुळे जीर्ण अम्लपित्त उत्पन्न झाले. बाजारातील उपलब्ध OTC antacids किंवा तात्पुरती अम्लपित्तशामके आणि छर्दि दाबून टाकणाऱ्या आधुनिक औषधांच्या वारंवार वापराने प्रकुपित पित्तकफ दोष रक्तवहस्रोतोगामी झाले. त्याचे व्यक्त स्वरुप म्हणजे अनेक दिवसांपासून सर्वांगावर वारंवार उठणारी वरटीदंशसंस्थानवत् मंडले. कोठ हा रक्तप्रदोषज व्याधी असून अतिलवणरस सेवन, असम्यक् वमन/छर्दि अशा हेतूंनी प्रकुपित पित्त व कफ दोषप्रधान्यामुळे उत्पन्न होतो. म्हणून शीतपित्त, उदर्द आणि कोठ या त्रयींपैकी कोठ असे निदान या रुग्णामध्ये केले. अम्लपित्त व छर्दि बरोबर कोठाचा इतिहासहि होता. या संप्राप्तीची पुढची वाटचाल म्हणजे शुक्रधातुची दुष्टी.

**स एव कुपितो दोष: समुत्थानविशेषत:।**
**स्थानान्तरगतश्चैव जनयन्त्यामयान् बहून्।।** च.सू.१८/४५

कुपित झालेले दोष स्थानांतर करुन विविध स्थानांच्या आश्रयाने अनेकविध रोग उत्पन्न करतात.

**शुक्रदुष्टी-**

**वातपित्तश्लेष्मकुणपग्रन्थिपुतिपूयक्षीणमूत्रपुरीषरेतस: प्रजोत्पादने न समर्था भवन्ति ।।** सु.शा.२/३

**पूतिपूयनिभं पित्तश्लेष्मभ्यां.....।** सु.शा.२/४

**विकल्प संप्राप्ति**→ हेतू (कटू, अम्ल, लवण रस अतियोग, मद्यपान, तंबाखुसेवन) → अम्लपित्त (पित्तश्लेष्मजव्याधी) आमाशय → कोठ (पित्तश्लेष्मजव्याधी) रक्तवहस्त्रोतस → पूतिपूयशुक्र (पित्तश्लेष्मजव्याधी) शुक्रदुष्टी

रुग्णाच्या Semen analysis मधून पूतिपूय युक्त शुक्राची नोंदहि होतीच. उच्च दर्जाची प्रतिजैविके (Heavy Antibiotics) देऊनही pus cells मध्ये फारसा उपशय दिसला नाही.

चरकाचार्यांनी वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने वेगवेगळ्या अध्यांयात चिकित्सेच्या संदर्भात निश्चित निर्देश देणारी सूत्रे दिलेली आहेत.

**तस्माद्विकारप्रकृतीरधिष्ठानान्तराणि च।**
**समुत्थानविशेषांश्च बुद्ध्वा कर्मं समाचरेत्।।** च.सू. १८/४५

रोगाची प्रकृती, अधिष्ठानान्तरण आणि समुत्थानविशेष या तीन महत्त्वाच्या गोष्टी व्यवस्थित जाणून घेऊन मगच चिकित्सेला सुरुवात करावी. या रुग्णातील कुपित पित्त व कफ दोषांची व्याप्ती आमाशय (अम्लपित्त), रक्तवह स्रोतस (कोठ) आणि शुक्रधातु (पूतिपूय शुक्रदुष्टी) अशी स्पष्ट असल्याने एक विशिष्ट चिकित्साक्रम (protocol) ठरवला. त्यानुसार सर्वप्रथम अम्लपित्त व कोठ आणि मग शुक्रदुष्टीची चिकित्सा असा क्रम ठरवला. यासाठी शमन, आमपाचन, वमन, विरेचन आणि वृष्य बस्ती अशी एकूण चिकित्सा योजना ठरवून रुग्णालाही नीट समजावून सांगितली.

**चिकित्सा:** १७/७/१० **शमन:** १)आरोग्यवर्धिनी वटी ५०० mg रोज २ वेळा (अपानकाळी) २)सारिवा वटी ५०० mg रोज २ वेळा (अपानकाळी)

१/९/१० **वमन:** पूर्वकर्म आभ्यंतर स्नेहन- महातिक्त घृत- वर्धमान मात्रेत-५दिवस प्रात: काळी

बाह्य स्नेहन-अभ्यंग-तिळतेल+सैंधव-पुढील ३ दिवस

स्वेदन- दशमूळ क्वाथ बाष्प स्वेद- पुढील ३ दिवस

वामक द्रव्ये- मदनफल चूर्ण व सैंधव यांचे मधातून चाटण आणि वमनोपग- यष्टिमधु फांट. उत्तम मात्रेत वेग आणि आपित्तदर्शन झाल्यावर वमन थांबवले. पुढे संसर्जन क्रम संपल्यावर वृष्य चिकित्सा सुरु केली.

९/९/१०: श्रीफलादिचूर्ण ३ gm ३ वेळा

सुवर्णमकरध्वज १२५ mg रात्रौ

**चिकित्सा विचार: कुष्ठोक्तं च क्रमं कुर्यात् अम्लपित्तघ्नमेव च।** (चक्रदत्त) हा संदर्भ आणि अम्लपित्तघ्न व कोठ चिकित्सेचा समान धागा पकडून पित्तकफघ्न शमन चिकित्सा सुरु केली. आरोग्यवर्धिनी हे कुष्ठावरील बहुप्रयुक्त औषध आहे. ही दीपनी, पाचनी, पथ्या व सर्वरोगषु शस्त आहे. सर्व घटकद्रव्यांच्या सहभाग असणारी कुटकी ही कफपित्तघ्न व मलशुद्धिकर आहे. यात चित्रकासारखे श्रेष्ठ दीपन द्रव्य आहे. भावना द्रव्य कडुनिंब हे सुद्धा उत्कृष्ट पित्तकफनाशक व रसरक्तप्रसादक आहे. त्यामुळे सामपित्त असणाऱ्या किंवा कफपित्तप्रधान अशा अम्लपित्तात हा अतिशय उपयुक्त कल्प आहे असा अनुभव आहे. सारिवा ही पित्तशामक, रक्तप्रसादक हा अतिशय

**शुक्रदोषप्रमेहा: तु व्यानापानप्रकोपजा:। (सुश्रुत)**

उपयुक्त कल्प आहे असा अनुभव आहे. सारिवा ही पित्तशामक, रक्तप्रसादक आणि शुक्र व ओजोवर्धक आहे. **(सारिवा शुक्रं वर्धयति माधुर्यात् स्निग्धत्वात्।)**

अम्लपित्त उपशयानंतर – रक्तगत दोषपाचनार्थ आरोग्यवर्धिनी वटी ५०० mg रोज अपानकाळी पुढे काही दिवस चालू ठेवली. दरम्यान निदानपरिवर्जन, पथ्याहार व आमपाचक चिकित्साही दिली व शोधनाची अनुकुलता पाहून स्नेह–स्वेदनोत्तर वमन देण्याचे योजिले.

**तत्र वायो: पित्तस्थानगतस्य पित्तवत् प्रतीकार:, पितस्य च कफस्थानगतस्य कफवत्, कफस्य वातस्थानगतस्य वातवत् क्रियाविभाग:।** सु. सू. २१/३१

सुश्रुतसंहितेतील या संदर्भानुसार कुपित पित्त हे कफाच्या स्थानात गेल्यास त्याची कफवत् चिकित्सा करावी म्हणुनच अम्लपित्तात कफाची श्रेष्ठ चिकित्सा वमन आवश्यक असते.

**व्याधिरामाशयोत्थोऽयं कफपित्ते तदाश्रये।**

**..........वमनं संप्रकल्पयेत्।**

**नान्यो मान्य: क्रमो ह्यस्य शान्तये वमनादृते।।** का.खि.१६१९

आमाशयसमुत्थ कफपित्तप्रधान अशा अम्लपित्ताच्या समूळ निवारणार्थ काश्यपांनी क्षीणबल व क्षीणमांस नसणाऱ्या व्यक्तीस चिकित्साक्रमात प्राधान्याने वमन देण्यास सांगितले आहे. अशा रुग्णांचे आम्लपित्त वमनाशिवाय शान्त होऊच शकत नाही.

**पूर्वं तु वमनं कार्य पश्चात् मृदु विरेचनम्।**

**कृतवान्त विरेकस्य सुस्निग्धस्यानुवासनम्।।** यो.र.

वमनानंतर उर्वरित दोषांचे निर्हरण विरेचनाद्वारे करावे. यामुळे क्रमश: विरेचन व बस्ती हे उपक्रम ठरवले. दरम्यान वमनाद्वारे कफपित्ताचे उत्तम निर्हरण झालेले असल्याने मधल्या काळात वृष्य कल्प सुरु केले. श्रीफलादिचूर्ण हा **यशस्वी औषधी (वैद्य नि.दे.देशपांडे)** या ग्रंथातील अनुभूत योग असून अनेक वैद्यांना या कल्पाने उत्तम यश व कीर्ती मिळवून दिली आहे. यामध्ये आमलकी, यष्टिमधु, शतावरी, गोक्षुर व खडीसाखर ही द्रव्ये समप्रमाणात आहेत. ही सर्व द्रव्ये मधुर रसात्मक, शीत वीर्य व मधुर विपाकी रसायन–वृष्य आहेत. **रतिकाले रतान्ते सेवितोऽयं रसेश्वर: (र.चं.)** अशी ख्याती असलेला सुवर्णमकरध्वज हा सुपरिचित वाजीकरण कल्प आहे. **घृतक्षीरादि देहमनोबलकरं सद उभयकरं इति।** (डल्हण) या हेतूने देहबलवर्धक व मनोबलवर्धक परिणामी वृष्य म्हणून दूध व तुपाचे नियमित सेवन करावयास सांगितले. ३ आठवडे ही चिकित्सा चालू होती. शमन, आमपाचन, वमन आणि वृष्य अशी एकूण ८ आठवडे चिकित्सा झाली होती. यानंतर शरद ऋतु सुरु झाला व पित्तदोष शोधनार्थ अनुकूल काळ म्हणून स्नेहपूर्वक विरचेनासाठी रुग्णाचे समुपदेशन केले. सम्यक स्नेहन, स्वेदन झाले होते आणि दोनदिवसांनी ३१/१०/१० रोजी विरेचनार्थ अभयादि मोदक ३५० mg देणार एवढ्यात विरेचन रद्द करावे का अशी विनंतिवजा विचारणा रुग्णाने फोन करुन केली. कारण विचारले असता रुग्णाने पत्नीची pregnancy test positive आल्याचे सांगितले. रुग्णाचे अभिनंदन तर केलेच, मात्र उत्क्लिष्ट दोष शरीरातच संचित राहून पुन: विरेचन अयोगाचे किंवा काही अन्य उपद्रवात्मक संप्राप्ती घडू नये म्हणून त्यास विरेचन घेण्यास भाग पाडले. उलट पडताळणी म्हणून रुग्णाला semen analysis करुन घेण्यास सांगितले. चमत्कार झाल्यासारखा sperm count 70 million वर पोहचला होता तर motility 70% आणि normal sperm ची संख्या २०% इतकी होती. अनेक वर्षात रुग्णाने इतका सुखद धक्कादायक report बघितला नव्हता. अडीच वर्षे लाखो रुपये खर्च करुन जे घडले नव्हते ते आयुर्वेदीय चिकित्सेने केवळ एक–दिड महिन्यात घडले होते. वंध्यत्व म्हटले की वाजीकर औषधाचा वापर हे समीकरण ठरलेलेच असते. मात्र हेतू, प्रकुपित दोषांचे अधिष्ठान, स्थानांतर, त्यानुसार उद्भवलेले व्याधी/लक्षणे, या सर्व घटकांमधून घडलेली संप्राप्तीची दिशा, त्या अनुषंगाने केलेली सर्वसमावेशक अशी शमन–वमन–वाजीकर चिकित्सा ही अधिक फलदायी आणि चिकित्सेचा आनंद देणारी होती.

**वैद्य महेश ठाकूर**, डोंबिवली,
मो. नं.: ९९३०३०४४९५

**नित्य व्यवसायातील उपयुक्त संग्राह्य पुस्तक**

**गुरुवर्य वैद्य श्री. कृ. करमरकर यांच्या मौलिक विचारांच्या लेखांचा संग्रह**

**चिकित्सा नवनीत**

**(सुधारित दुसरी आवृत्ती)**

**पृष्ठे – ३२८ किंमत – रू. ३००/–**

**शोधन ही चिकित्सा क्लैब्यात व्याधीबल, दोषबल व रुग्णबल यांचा विचार करुन योजावी.**